# दि. १७/१०/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे

## इतिवृत्त

दिनांक १७.१०.२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. अध्यक्षा जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

१. मा. सौ. आरतीताई फुपाटे, अध्यक्षा जिल्हा परिषद यवतमाळ
२. मा. श्री. बाळा साहेब मांगुळकर उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ
३. मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
४. मा. सौ. लताताई खांदवे सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
५. सन्मा. सौ. कमलताई राठोड सदस्यां जिल्हा परिषद यवतमाळ
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. शहापुरकर लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
२. श्री. अमित आडे उपकार्यकारी अभियंता ग्रा. पा.पु. वि. यवतमाळ
३. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
४. श्री. अे.टी. पदमावार उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पुसद
५. श्री. के.एम. मानकर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
६. श्री. संजय येवले उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पांढरकवडा
७. श्री. पी.पी. देशपांडे उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
८. श्री. व्हि. जे. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भु.सं.वि.य. यवतमाळ
९. श्री. एस.एम. दारव्हटकर सहा. अभियंता य.म.प्र. विभाग यवतमाळ
१०. श्री. श्री. पी. आर. कुरळकर क.अभि.ग्रा.पा.पु. उपविभाग राळेगाव
११. श्री. अ.ना. निसाळ उप कार्यकारी अभियंता सिंचन विभाग यवतमाळ
१२. श्री. मनोज निरंजने सा.व.वि. यवतमाळ
१३. श्री. कैलास मसोदे उप कार्यकारी अभियंता महावितरण यवतमाळ
१४. श्री. प्रफुल अनंतराव पांडे स. अभि. महावितरण यवतमाळ
१५. श्री. व्ही.एच. गावंडे उ.का.अ. म.जी.प्रा. ना.व ग्रा. विभाग यवतमाळ
१६. श्री. पी. बी. बन्सोड क.अभि. ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ

१७. श्री. नितिन के. शहाडे क.अभि. ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
१८. श्री. एस. एम. शेकोकार N B A Z. P. Ytl.
१९. श्री. दि. सु. देशकर, म.जी.प्रा. यवतमाळ
२०. श्री. एच. एस. वाळके पा. पु. उपविभाग राळेगाव
२१. श्री. एम.एम. जोशी क.अभि. पांटबंधारे विभाग यवतमाळ
२२. श्री. एच.एम. खटारे वनपाल उपवनसंरक्षक वनविभाग पुसद
२३. श्री. पी. एम. जयस्वाल उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग वणी जि.प. यवतमाळ
२४. श्री. वाय. डी. उमरे क.अभि. जि.प. पाणी पुरवठा उपविभाग पांढरकवडा
२५. श्री. जालींदर पठारे ग.वि.अ. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना यवतमाळ
२६. कु. सोनाली शेंडें क.अभि. ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
२७. श्री. सी.सी. मनवर तंत्र अधिकारी जि.अ. कृ. अधिकारी
२८. श्री. हर्षदिप बन्सोड क.अभि. पाणी पुरवठ विभाग जि.प. यवतमाळ
२९. श्री. हरीश मो. कठारे कनि. भुवैज्ञानिक पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
३०. श्री. प्रशांत इंगोले कनि.अभि. क.अभि. पा.पु. उपविभाग पांढरकवडा जि.प. यवतमाळ
३१. श्री. पी. एस. येंडे शा.अ. पांढरकवडा

*******

सर्व प्रथम अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरुवात केली.

**विषय क्र. १ :- दिनांक २३/०९/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्र. १ :- दिनांक २३/०९/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयाचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने खालील प्रमाणे सादर केला.

त्यानंतर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी झरी तालुक्यातील शिबला येथील योजने बाबत काय कार्यवाही करण्यात आली तसेच आदिवासी विभागातील ५० पंप बंद आहेत.

शेतक-यांची ओरड होत आहे त्याबाबत काय कार्यवाही केली अशी विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा विभाग वणी यांनी आचार संहीते नंतर काम पुर्ण करण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पांढरकवडा व पुसद विभाग येथील कोणीही प्रतिनिधी आलेले नसल्यामुळे पांढरकवडा विभागा अंतर्गत कामाचा आढावा घेता आला नाही या बाबत मा. अध्यक्षांनी तिव्र नाराजी व्यक्त केली व पुढील सभे करीता अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना बोलविण्या बाबत सुचना दिल्या.

**विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

त्यांनतर मा. मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव येथील योजना कधी सुरु होणार तसेच सावंगी येथील योजने बाबत २ १/२ वर्षापासुन कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, सदर ठीकाणी नविन नळ योजना मिळणे बाबत मागणी होती त्या बाबत काय उपाय योजना केली अशी विचारणा केली असता म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने मारेगाव येथील योजनेचे कामाची सुरुवात झाली असल्याचे सांगीतले. सावंगी येथील योजनेच्या कामा बाबत उपअभियंता पा.पु. उपविभाग वणी यांनी सदर प्रस्ताव सन २०१५-१६ चे आराखडया मध्ये घेण्यात आलेला असल्याचे सांगीतले. तसेच सदर गावातील लोकसंख्या कमी असल्यामुळे नदीवरुन नळ योजना घेणे गावक-यांना देखभाली करीता परवडणार नसल्याचे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सदर कामाचे इस्टिमेट तयार करुन घ्या पुढील कार्यवाही मंत्रालयातुन करुन घेता येईल असे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी हर्षी येथील योजने बाबत काय कार्यवाही केली अशी विचारणा केली यावर म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने हर्षी येथील योजना हस्तांतरण बाबत कार्यवाही सुरु असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ४० गावांचे योजने बाबत माहीती विचारली परंतु म.जी.प्रा. चे प्रतिनिधी सदर माहीती देऊ शकले नाही. यावर संबंधितांनी मा. अध्यक्षांकडे येऊन माहीती उपलब्ध करुन देणे बाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिल्या.

**विषय क्र. ४:- संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे २२६८५ एवढे एकूण उद्दीष्ट आहे. त्यापैकी APL चे १४१७४ व BPL चे ८५११ एवढे उद्दीष्ट आहे. माहे सप्टेंबर २०१४ अखेर पर्यंत APL चे २७४२ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे १३०१ असे एकूण ४०४३ एवढे वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण १८ % काम पुर्ण झाले असल्याची माहीती दिली..

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने शौचालयाचे बांधकामा करीता आता रु. १० हजारा ऐवज रु. १२ हजार देण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी वैयक्तीक शौचालयाचे बांधकामा बाबत वणी, मारेगाव कडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी मागील सभेमध्ये श्री. सुभाषभाऊ ठोकळ यांनी पाथ्रड देवी ता. दारव्हा येथील शौचालयाची देयके देण्यात नाही. तसेच ब-याच ठीकाणी शौचालयाचे देयक बाकी आहेत याबाबत मुद्दा उपस्थित केला होता त्या बाबत काय कार्यवाही केली अशी विचारणा केली यावर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने सर्वांना पैसे देण्यात आलेले आहे तसेच सर्व ग.वि.अ. पं.स. यांना निधी वितरीत करण्यात आला असल्याचे सांगीतले.

**विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ७२७३
२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ४९८६
३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - २३६०
४. सद्यस्थितीत सुरु विहीरींची संख्या - २६२६
५. विहीरींवरील झालेला एकूण खर्च - ३५०७.५९

**विषय क्र. ६ :- पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत तालुका निहाय कामाची माहीती संबंधीत उपअभियंता यांनी खालील प्रमाणे सादर केली.

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखड्यामधील उद्दीष्ठीत ९५ गांवे व बिगर उद्दीष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ (Target ) | | २०१३-१४ (Non Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरू केलेली कामे | प्रस्तावित कामे | मंजुर कामे | |
| यवतमाळ | यवतमाळ | ४ | ४ | १४ | १४ | १२ |
| | आर्णी | १३ | १३ | ३ | ३ | ० |
| | बाभुळगांव | १ | १ | ९ | ८ | २ |
| **एकुण** | | **१८** | **१८** | **२६** | **२५** | **१४** |
| दारव्हा | दारव्हा | १ | १ | ६ | ६ | २ |
| | नेर | २ | २ | ९ | ८ | ७ |
| **एकुण** | | **३** | **३** | **१५** | **१४** | **९** |
| पांढरकवढा | पांढरकवडा | १ | १ | ३ | ३ | १ |
| | घाटंजी | ६ | ६ | ३ | २ | १ |
| **एकुण** | | **७** | **७** | **६** | **५** | **२** |
| राळेगांव | राळेगांव | २ | २ | ५ | ५ | ० |
| | कळंब | २ | २ | ११ | १० | ६ |
| **एकुण** | | **४** | **४** | **१६** | **१५** | **६** |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | १ |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ४ |
| | उमरखेड | ० | ० | १ | १ | १ |
| | महागांव | ० | ० | २ | २ | १ |
| **एकुण** | | **४** | **४** | **८** | **८** | **७** |
| वणी | वणी | १ | १ | ४ | ४ | ० |
| | मारेगांव | ५ | ५ | ५ | ४ | १ |
| | झरी | ४ | ४ | २ | २ | ० |
| **एकुण** | | **१०** | **१०** | **११** | **१०** | **१** |
| **जिल्ह्याचे एकुण** | | **४६** | **४६** | **८२** | **७७** | **३९** |

त्यांनतर मा. मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी नगारापोड येथील विहीर खोलीकरणामध्ये घ्या असे सांगीतले. यावर उपअभियंता पा.पु. उपविभाग वणी यांनी सदर गाव आराखडयामध्ये घेण्यात येईल असे सांगीतले

त्यांनतर मा. अध्यक्ष यांनी पाण्याची पातळी कशी आहे व सर्वे बाबत विचारणा केली यावर श्री. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी डिसेंबर ते जानेवारी पर्यंत सर्वे पुर्ण होईल व पातळी बाबत अहवाल सोमवार पर्यंत मा. मु.का.अ. यांचे कुडे सादर करण्यात येईल असे सांगीतले.

त्यानंतर मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सौर दुहेरीपंपा च्या कामा बाबत माहीती सादर करा अश्या सुचना दिल्या यावर उपअभियंता (यां) सन २०१४-१५ च्या आराखडया नुसार १०४ योजना मंजुर आहेत दिनांक ३०.०६.२०१४ पर्यंत या योजनांचे कामासाठी ३ कंपन्यांचा शासनमान्य दरकरार अस्तीत्वात होता. १. मे.पर्ल इंटरप्रायजेस पुणे २. मे. उर्जा फ्युचर सिस्टीम पुणे ३. विस्तार इलेक्ट्रॉनिक्स पुणे या कामांची अमलबजावणी वेळेत करणे साठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशा नुसार दिनांक. १६,१७ व १८.०६.२०१४ रोजी सर्व गट विकास अधिकारी कार्यालयात त्या तालुक्यातील गावांच्या ग्रामसेवक, सरपंच, पाणी पुरवठा अभियंता, कनिष्ठ अभियंता, वरिष्ठ भुवैज्ञानिक , उपअभियंता (यां) त्यांचे कनिष्ठ अभियंता हे हजर होते या बैठकामध्ये ग्रामपंचायतीने विहीत लोकवाटा भरणे किंवा सुट असल्यास तसे प्रमाणपत्र देणे, योजनेला प्रशासकीय मान्यता देणे व दर करार मान्य कंपनीस कामाचे आदेशस देणे यासाठी सविस्तर मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार ३० जुन २०१४ पर्यंत फक्त ३२ गावांनीच आवश्यक कार्यवाही अनुसरली. त्यामुळे ३२ गावांनाच जिल्हास्तरीय समितीने आर्थीक मान्यता प्रदान केली. ७२ गावांची कामे प्रलंबीत आहेत. आता शासनाने ९ जुलै २०१४ च्या निर्णयाने लोकवर्गणीची अट पुर्णता रद्य केल्याने या गावांची कामे त्यांना करता येतील पण त्यासाठी त्या समित्यांनी ई- टेंडरींग करणे गरजेचे आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून मा. संचालक भु.सं.वि.य. पुणे यांना दि. २९.०९.२०१४ च्या पत्राने या बाबत मार्गदर्शन मागीतले आहे असे सांगीतले. यावर झालेल्या सवीस्तर चर्चेअंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपअभियंता (यां.) यांना सुचना केली की, उर्वरीत ७२ गावांच्या ग्रामपंचायतींना ई- टेंडरींग ही कामे करण्याबाबत तात्काळ पत्र पाठवावे. तसेच सर्व पाणी पुरवठयाचे उपअभियंता यांनी सुध्दा ही कामे करण्यासाठी पाठपुरावा करावा अश्या सुचना दिल्या.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी धडक सिंचन विहीरींच्या कामा बाबत व एकूण कीती तलाव आहेत या बाबत विचारणा केली. यावर उपकार्यकारी अभियंता सिंचन विभाग यांनी सदर विहीरींची कामे पुर्ण करणे करीता १ वर्षाची मुदत मिळालेली आहे. यावर्षी १७५ लक्ष निधी मिळालेला आहे. तसेच एकूण ६९५ तलाव असल्याचे सांगीतले. यावर झालेल्या सवीस्तर चर्चेअंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपकार्यकारी अभियंता सिंचन विभाग यांना

त्यानंतर म. अध्यक्षा यांनी वडदब्रम्ही येथील पाझर तलावा बाबतची माहीती विचारली असता उपकार्यकारी अभियंता सिंचन यांनी माहीती घेऊन सादर करतो असे सांगीतले.

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थितांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्या बाबत उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग हयांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षा यांचे अनुमतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**आरती फुपाटे**
**अध्यक्षा**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**